रयत शिक्षण संस्थेचे

## डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव

## पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग

२०२४ -२५

युवास्पंदन – भित्तिपत्रक

# स्वातंत्र्यदिन विशेषांक

## १५ ऑगस्ट २०२४



### संपादक मंडळ

**अध्यक्ष** : प्र. प्राचार्य, डॉ. बाळासाहेब चव्हाण

**सदस्य** : डॉ. देवानंद सोनटक्के

प्रा. अश्विनी मांढरे

**विद्यार्थी :**

१ . पुर्वा चव्हाण, बी. ए. १

२ . वैष्णवी गायकवाड, बी. ए. १

३ . श्रावणी मोहिते, बी. ए. १

३ . प्रियांका कांबळे,बी. ए. २

४ . ऋतुजा पवार, बी. ए. ३

५ . अंकिता संकपाळ, बी. ए. ३



अभिमान आणि नशीब आहे कि, भारत देशात जन्म मिळाला जसे इंग्रजापासून मुक्त झालो तसे आता भष्ट्राचार मुक्त भारत करूया......

# स्वातंत्र्याचा जयघोष

वीरांनी लढविले रण,
आला स्वातंत्र्याचा क्षण।
त्याग, बलिदान, पराक्रमाने,
भारत झाला स्वाधीन।

झेंडा हा शोभून दिसे,
तिरंगा मानाने झळके।
स्वप्न होतं या धरणीचं,
बंध तोडूया मुक्तीच।

शूरांनी दिले प्राण,
त्यागला सर्व अभिमान।
त्यांच्या या बलिदानात,
स्वातंत्र्याचे विजयी गान।

आज आम्ही स्वतंत्र झालो,
आनंद रसात न्हालो।
हीच आहे ती धरती,
जेथे स्वातंत्र्याची महती।

## स्वातंत्र्य दिनाचा उत्सव :

स्वातंत्र्य दिन हा भारतातील तीन राष्ट्रीय सुट्ट्यांपैकी एक असतो. (इतर दोन म्हणजे २६ जानेवारी- प्रजासत्ताक दिन आणि २ ऑक्टोबर- महात्मा गांधींचा जन्म दिवस) हा दिवस सर्व भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये साजरा केला जातो. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला, भारताचे राष्ट्रपती "राष्ट्राला संबोधित" करतात. १५ऑगस्ट रोजी पंतप्रधान हे दिल्लीतील लाल किल्ल्याच्या ऐतिहासिक स्थळाच्या तटबंदीवर भारतीय ध्वज फडकावतात. आपल्या भाषणात पंतप्रधान गेल्या वर्षातील कामगिरीवर प्रकाश टाकतात, महत्त्वाचे मुद्दे मांडतात आणि पुढील विकासाचे आवाहन करतात. " जन गण मन " हे भारतीय राष्ट्रगीत गायले जाते. भाषणानंतर भारतीय सशस्त्र दल आणि निमलष्करी दलाच्या तुकड्यांचा मार्च पास्ट होतो. परेड आणि स्पर्धांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील देखावे आणि भारताच्या विविध सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडते. अशाच घटना राज्यांच्या राजधानीत घडतात जेथे वैयक्तिक राज्यांचे मुख्यमंत्री राष्ट्रध्वज फडकवतात, त्यानंतर परेड आणि स्पर्धा होतात. फेब्रुवारी १९७४ मध्ये, तामिळनाडूचे मुख्यमंत्री, एम. करुणानिधी यांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे हा मुद्दा उचलून धरला की पंतप्रधानांप्रमाणेच मुख्यमंत्र्यांनाही स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वज फडकावण्याची परवानगी देण्यात यावी. १९७४ पासून संबंधित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वज फडकावण्याची परवानगी आहे. ध्वजारोहण समारंभ आणि सांस्कृतिक कार्यक्रम देशभरातील सरकारी आणि निमसरकारी संस्थांमध्ये होतात. शाळा आणि महाविद्यालये ध्वजारोहण समारंभ आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात.

श्रावणी मोहिते,
(बी. ए. १)

# माझा देश

सुंदर - सुंदर माझा देश...
सगळ्यात वेगळा माझा देश.
जग ज्याच्यावर गर्व करेल...
असा अनोख्या माझा देश.

चांदी सोने माझा देश...
सुजलाम - सुफलाम माझा देश.
गंगा - यमुनेच्या माळेचा...
फुलांसारखा माझा देश.

प्रगती करेल माझा देश...
नियमित खुशाल माझा देश.
इतिहासामध्ये नाव करेल
असा महान माझा देश

धन्यवाद...

मुल्लाबि रोजमीन


अभिमान आणि नशीब आहे कि,
भारत देशात जन्म मिळाला
जसे इंग्रजांपासून मुक्त झालो
तसे आता भ्रष्टाचारमुक्त
भारत करूया
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
marathivarsa.com


भारत
या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी केला होता त्याग,
वंदन करुनीया तयांसी आज...
ठेऊनी त्यांच्या बलिदानाची जाण,
करुया भारतदेशा असंख्य प्रणाम....

# स्वतंत्र भारत

स्वातंत्र्य हा फक्त असा शब्द आहे जो प्रत्येक भारतीयांच्या नसानसात रक्तासारखा संचार करत असतो. स्वातंत्र्य हा प्रत्येक माणसाच्या जन्म-सिद्ध हक्क आहे. तुलसी दास म्हणतात. "पराधीन सपनेहु सुखनाही" म्हणजे गुलामगिरीमध्ये तर स्वपनात देखील सुख नाही. गुलामगिरी तर कोणासाठीही अभिशाप आहे. ज्यावेळी आपला देश गुलामगिरी-मध्ये होता. तेव्हा आपल्या देशाचा झेंडा नव्हता आणि आपले असे संविधान पण नव्हते.

"तो सोन्याचा दिन उगवला
घातकांच्या यज्ञातून उठली,
फक्त केशरी ज्वाला,
दहा दिशांच्या ह्दयामधुनी,
अरुणोदय झाला..."

१५ ऑगस्ट १९४७ रोजी तो सोन्याचा दिवस उजाडला आपला भारत देश पूर्णपणे स्वतंत्र झाला.

जय हिंद । जय भारत


INDIA

# मायभूमी


या जन्माचा नजराणा,
माय भूमीस पेश व्हावा....
तिरंगाच माझा,
गणवेश व्हावा....
सांडावे रूधीर,
या मातृभूमीसाठी ....
हरेक जन्मी,
भारत माझा देश व्हावा....
रंग बलिदानाचा,
त्या तिरंग्यात पडावा....
उत्साह देश प्रेमाचा,
अंगी संचारावा.....
~~स~~ जयघोष भारताचा,
आसमंती गुंजावा ....
सण हा स्वातंत्र्याचा,
सदैव चिरायु व्हावा....

~~ध~~ धन्यवाद....

वैष्णवी गायकवाड
(बी. ए. भाग-१)


# स्वातंत्र्य दिन
# मराठी चारोळ्या

तिरंगा आमचा भारतीय झेंडा
उंच-उंच फडकवू,
प्राणपणाने लढून आम्ही
शान याची वाढवू



भारतभूमी स्वतंत्र करण्या
तळहाती घेऊनी प्राण,
बलिदानाचे कफन बांधूनी
लढले वीर महान

स्वातंत्र्याची ध्वजा फडकते
सूर्य तळपतो प्रगतीचा
भारतभूमीच्या पराक्रमाला
आमुचा मानाचा मुजरा



किती आक्रोश तो झाला
किती रक्तांच्या नद्या वाहल्या
सडा पडला मृतदेहांचा
तेव्हा स्वातंत्र्यदिन उदयास आला.

अंकिता संकपाळ बी.ए.३




प्रियंका काबळे (बी.ए. भाग २



--मुक्त हो रे मनपाखरा--

## --देशभक्ती--

मीच येथे गुंग माझ्या देशप्रेमात आहे,
अभिमान आहे मी माझ्या वतनात आहे..।

जगल्यास ही जिंदगी आहे खूप सुंदर,
भारताचे नाव अमुच्या देहात आहे..।

नका ठेवू वैर कुणाशी माझ्या भावांनो,
सर्व धर्म समभाव ह्या भारतात आहे..।

वाचले आम्ही फक्त पुस्तकात पुर्वजांना,
देशभक्ती ही तर आमच्या रक्तात आहे..।


वाटले धर्म साऱ्यांनी,भूमातेसही येथे
म्हणे देव तर फक्त याच दगडात आहे..।

नेहमीच होते हिंसा लाख समजावूनीही,
माणूसकी तर येथे फक्त स्वप्नात आहे..।

--निलेश पाटील,--
--पारोळा,जि-जळगाव--
--मो-9503374833--

- --मुक्त हो रे मनपाखरा--




GPS Map Camera
Koregaon, Maharashtra, India
M5PG+J2V, Koregaon, Maharashtra 415501, India
Lat 17.686699°
Long 74.175119°
15/08/24 08:42 AM GMT +05:30
Google







१५ ऑगस्ट २०२४ स्वातंत्र्य दिन भित्तीपत्रक उद्घाटन प्र. प्राचार्य बाळासाहेब चव्हाण व विज्ञान विभागाच्या उपप्राचार्य प्रा. अश्विनी साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले.

डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगांव जि. सातारा